भा. पा. हिवाळे शिक्षण संस्था संचालित

ग्रामीण विकास अध्ययन केंद्र - समाजकार्य व संशोधन संस्था,

अहमदनगर

विषय

# कोविड-१९ परिस्थितीत वृद्धांच्या मानसिक आरोग्य संदर्भात केलेला समाजकार्य हस्तक्षेप

विद्यार्थ्याचे नाव

मधुमिता फडके

# विषय परिचय

- वयवर्ष ६० किंवा त्यावरील वयोगटातील लोकांचा समावेश जेष्ठ नागरिक किंवा वृद्ध.
- 2011 च्या जनगणनेनुसार भारतात जवळपास १०४ मिलियन लोक वृद्ध लोक आहेत.
- १९६१ मध्ये ५.६% असणारा दर २०११ मध्ये ८.६% पर्यंत हा दर जाऊन पोहचलेला दिसतो.
- हि सर्व वृद्ध लोक हे आर्थिक, शारीरिक व भावनिकदृष्ट्या इतरांवर अवलंबून असतात. भारतात हा वृद्धांच्या अवलंबनाचा दर २०११ च्या जनगणनेनुसार १४.२ % इतका आहे.

- वृद्धांमध्ये प्रामुख्याने शारीरिक समस्या वाढत जाताना दिसतात. यात रक्तदाब, शरीरातील साखरचे प्रमाण वाढणे, हृदया संबंधी आजार,हाडांचे व स्नायूंचे दुखणे ई. समस्या दिसून येतात. जानेवारी २०२० मध्ये कुटुंब आणि आरोग्य कल्याण मंत्रालयाने प्रकाशित केलेल्या **Longitudinal Ageing Study in India(LASI)** यानुसार तीनपैकी दोन वृद्ध व्यक्ती जुनाट आजाराने ग्रस्त असतात.


  शारीरिक समस्या बरोबरच वृद्धांमध्ये मानसिक आरोग्य संदर्भात देखील समस्या वाढताना दिसत आहे. या **LASI** सर्वेक्षाना नुसार २०% वृद्ध व्यक्तींना मानसिक आरोग्य संदर्भात समस्या आहेत. यात नैराश्य, स्मृतिभ्रंश व अति चिंताग्रस्त असणे अशा समस्या प्रामुख्याने दिसतात.

  कोविड -१९ च्या परिस्थितीत अनेक कुटुंबांचे उदरनिर्वाहाचे साधन गेले. अशा परिस्थितीत आर्थिक असुरक्षितता, कोविड – १९ संसर्ग होण्याची भीती, नैराश्य, एकाकीपणा या समस्या वृद्धाबाबत दिसून आल्या.

# समाजकार्य हस्तक्षेप

- समाजकार्य प्रशिक्षणार्थीने शेवगाव येथील प.पू.दादाजी वैशंपायन वृद्धाश्रम मधील वृद्धांच्या मानसिक आरोग्य सदृढ करण्याच्या दृष्टीने कार्य केले.
- या वृद्धाश्रमातील वृद्धांमध्ये प्रामुख्याने नैराश्य, चिंताग्रस्त असणे, चिडचिडेपणा अशा समस्या दिसून आल्या.
- कोविड-१९ च्या काळात बाहेर जाण्यास बंधन किंवा इतर लोकांना भेटण्यास निर्बंध आल्याने या व्यक्तीमध्ये एकाकीपणा जाणवत असल्याचे दिसून आले. तसेच याकाळात नैराश्य व चिंता यांचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले.

- वृद्धांमध्ये दिसुन येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व त्यांचे मानसिक आरोग्य सुधारण्याच्या उद्देशाने समाजकार्य प्रशिक्षणार्थीने समाजकार्य पद्धती मधील पुढील दोन पद्धतींचा वापर करून या संदर्भात कार्य केले. यात संस्थेतील १० वृद्ध व्यक्तीच्या गटासमवेत गटकार्य व संस्थेतील समस्याग्रस्त व्यक्ती समवेत व्यक्ती सहकार्य पद्धत वापरण्यात आली.



# कार्यात आलेल्या अडचणी

- वृद्धांचा कमी प्रतिसाद
- वृद्धांचा सहभागी होण्यास उत्साहाची कमतरता
- संवादमधील अडचणी
- मानसिक आरोग्य संदर्भात माहिती नसणे.
- नवीन गोष्टी करण्याची मानसिकता नसणे.
- उदासीनता

# निष्कर्ष

- एकाकाकीपणा कमी
- उदासीनता कमी होण्यास मदत झाली.
- वृद्धांनी स्वतः स व्यक्त करण्यास सुरवात केली.
- मानसिक आरोग्य विषयी जाणीव निर्माण झाली.

# समारोप

- कुटुंब व्यवस्थेतील बदल, आर्थिक असुरक्षितता व आरोग्य विषयक सुविधांची कमतरता यामुळे वृद्धांच्या समस्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे.
- तसेच वृद्धांचे मानसिक आरोग्य याविषयी जागरूकता नसल्याने त्यांसंदर्भातील समस्याकडे मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष होताना दिसते.
- यासाठी मानसिक आरोग्य बाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी शारीरिक आरोग्य सेवा बरोबरच मानसिक आरोग्य सेवा वाढवणे आवश्यक आहे. यासाठी शासकीय व अशासकीय अशा दोन्ही पातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे.